खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

तुम्ही जिथे आहात
तिथून सुरुवात करा,
तुमच्याकडे जे आहे त्याचा वापर करा,
जे करू शकता ते करा.

वर्ष : ०५ | अंक : २७६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१८ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## विदर्भातील प्रवास सुस्साट होणार! ५४७ किमी लांबीच्या चार महामार्गांना मंजुरी

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.१७, नागपूर :** विदर्भातील प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी आहे. राज्य सरकारने या भागात ४ मुख्य महामार्गांना मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी या सर्व प्रकल्पांची पाहणी करण्याचे आणि लवकरात लवकर भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. हे सर्व मार्ग एकूण ५४७ किमी लांब असून एकूण ५१,९०६ कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

बुधवारी (दि. १३ मे २०२६) मंत्रालयात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षेतीखाली झालेल्या एका बैठकीत या चारही प्रकल्पांना मंजुरी मिळाली. हे सर्व महामार्ग महामार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळातर्फे बांधण्यात येणार आहेत. २०२८च्या सप्टेंबर ते डिसेंबरपर्यंत हे महामार्ग प्रवाशांसाठी खुले करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

**पहिला महामार्ग – नागपूर ते चंद्रपूर**

या चारही प्रकल्पांपैकी सर्वात लांब महामार्ग म्हणजे नागपूर ते चंद्रपूर महामार्ग. हा मार्ग २०४.७९ किमी लांब असून नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यांमधील ९ तालुक्यांना जोडणार आहे. हा महामार्ग ४ पदरी असून यावरती ७ इंटरचेंज असतील. २,१५९ हेक्टर भूखंडावर हा संपूर्ण महामार्ग बांधण्यात येणार आहे.

**दुसरा महामार्ग – नागपूर ते गोंदिया**

नागपूर ते गोंदिया महामार्ग राज्यातील नागपूर, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांमधून जाणार आहे. हा १६२,३७ किमी लांब महामार्ग सहा पदरी असून यावरती ९ इंटरचेंज प्रस्तावित आहेत. एकूण १,६३४ भूखंडावर हा महामार्ग बांधण्यात येईल.

**तिसरा महामार्ग – भंडारा ते गडचिरोली**

भंडारा ते गडचिरो महामार्ग ९४.२४ किमी लांबीचा मार्ग असेल. हा महामार्ग भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यांमधून प्रस्तावित आहे. १,१८५ भूखंडावर उभारण्यात येणाऱ्या हा महामार्ग सहा पदरी असून यावरती सहा इंटरचेंज असतील.



**चौथा महामार्ग – नावेगाव मोर– कोनसरी ते सुरजागड मार्ग**

चौथा आणि शेवटचा महामार्ग चंद्रपूर आणि गडचिरोली सीम ेवर असलेल्या नावेगाव मोरला गडचिरोलीतील कोनसरी आणि पुढे गडचिरोलीतील सुरजागडापर्यंत जोडेल. चंद्रपूर आणि गडचिरोलीला जोडणारा हा एक महत्त्वाचा महामार्ग असेल. एकूण २८९ हेक्टर भूखंडावर या चार पदरी मार्गाचं बांधकाम होईल. हा महामार्ग मुंबई–नागपूर द्रुतगती महामार्ग आणि समृद्धी महामार्गाला जोडणार आहे.

चारही प्रकल्पांचा एकूण बांधकाम खर्च ३२,४७८ कोटी रुपये अपेक्षित असून एकूण प्रकल्प खर्च ५१,९०६ कोटी रुपये आहे.

या अतिरिक्त खर्चामध्ये भूसंपादन, उपयुक्तता आणि इतर सहाय्यक खर्चाचा समावेश आहे. दरम्यान, या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पश्चिम महाराष्ट्राला कोकणाशी जोडणाऱ्या बोगद्याचा अभ्यास करून या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्याचे निर्देशही दिले आहेत.




**दोन पिडीत महिलांची सुटका ; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**

**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.१७, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरातील वडगाव परिसरात असलेल्या हॉटेल रिलॅक्स रूम अँड लॉजिंगमध्ये सुरू असलेल्या देहव्यापाराच्या अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेने धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. दुसरा आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे. स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त माहिती मिळाली होती की, हॉटेल रिलॅक्स येथे महिलांकडून वेश्याव्यवसाय करवून घेतला जात आहे. माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवत सापळा रचला. त्यानंतर महिला पंच, सामाजिक कार्यकर्ते तसेच अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कक्षाच्या पथकासह हॉटेलवर छापा टाकण्यात आला. छाप्यादरम्यान सावजी पांडुरंग हस्तक (७४) व प्रदीप सावजी हस्तक (३०), दोघेही रा. वडगाव, चंद्रपूर हे पीडित महिलांकडून देहव्यापार चालवत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मोबाईल, रोख रक्कम, कंडोम बॉक्स, रजिस्टर आणि क्यूआर कोड असा एकूण ७ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या प्रकरणी सावजी हस्तक याला ताब्यात घेण्यात आले असून फरार आरोपी प्रदीप हस्तक याचा शोध पोलीस घेत आहेत. दोन्ही पीडित महिलांची सुटका करून त्यांना सुरक्षित ताब्यात देण्यात आले आहे. या कारवाईप्रकरणी राम नगर पोलीस ठाण्यात अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ अंतर्गत कलम ३, ४, ५ आणि ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक संतोष निंभोरकर, सुनिल गौरकार, सफौ धनराज करकाडे, पोहवा चेतन गज्जलवार, दिपक डोंगरे, कार्तिक खनके, पोअं किशोर वाकाटे, प्रफुल्ल गारघाटे, सुमित बरडे, मपोहवा छाया निकोडे, मपोहवा निराशा तितरे, मपोहवा विजयमाला वाघमारे, मपोशि अपर्णा मानकर, चालक पोहवा प्रमोद डंभारे, मिलिंद टेकाम, अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कक्ष चंद्रपूर व सायबर पोलीस स्टेशन चंद्रपूर यांनी केले.

## ओबीसींची दुसऱ्या टप्प्यात स्वतंत्र जनगणना होणार : मंत्री भुजबळ

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.१७, अहिल्यानगर :** राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी जातीनिहाय जनगणनेचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती आहे. सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या प्रक्रियेत ओबीसीच्या स्वतंत्र जनगणनेसह इतर काही महत्त्वाच्या बाबींवर केंद्राने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात जातीनिहाय जगगणना केली जाईल, असे ते म्हणालेत.


सध्या देशभरात जनगणनेची प्रक्रिया सुरू आहे. त्याद्वारे विविध घटकांची माहिती संकलित केली जात आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री छगन भुजबळ यांनी जातीनिहाय जनगणनेचा मार्क मोकळा झाल्याची माहिती दिली आहे. ते म्हणाले, देशभरात सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या प्रक्रियेत 'ओबीसी' च्या स्वतंत्र जनगणनेसह इतर काही महत्त्वाच्या बाबींकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधून त्यांचे पुनरावलोकन आणि आवश्यक सुधारणा करण्यासंदर्भात आपण केलेल्या मागण्यांवर केंद्र सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. जनगणना २०२७ च्या दुसऱ्या टप्प्यात जातीनिहाय जनगणना केली जाईल, असे केंद्र सरकारने अधिकृत पत्राद्वारे आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सरकारने स्पष्ट केलेल्या या भूमिकेबद्दल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री अमित शहा यांचे आभार मानतो.

भुजबळ म्हणाले, जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घर यादी (House-listing) प्रश्न क्र. १२ मध्ये सामाजिक वर्गीकरणासाठी केवळ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर असे तीनच पर्याय ठेवण्यात आले असून, इतर मागासवर्गीय (OBC) यांच्यासाठी स्वतंत्र रकान्याची कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे ओबीसी समाजाची विश्वासार्ह व अचूक जनगणना होणार नाही, म्हणून ही त्रुटी दूर करण्यासाठी जनगणनेच्या अर्जामध्ये ओबीसी या स्वतंत्र प्रवर्गाचा स्पष्ट समावेश करण्याची आग्रही मागणी ३० मार्च २०२६ रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच २७ मार्च २०२६ रोजी केंद्रीय गृहमंत्री व सहकार मंत्री अमित शाह यांच्याकडे मी सविस्तर पत्राद्वारे केली होती.

### दुसऱ्या टप्प्यात जातीनिहाय जनगणना

● केंद्र सरकारने आपल्या मागणीची दखल घेऊन सकारात्मक प्रतिसाद देत आपली भूमिका स्पष्ट केली. देशभरात जनगणना सुरू आहे. केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी जनगणनेच्या २०२७ च्या दुसऱ्या टप्प्यात जातीनिहाय जनगणना करण्यात येणार असल्याचे सरकारकडून स्पष्ट केले आहे. त्यामुळे ओबीसी समाजाची विश्वासार्ह व अचूक जनगणना होणार यात शंका राहिलेली नाही. जनगणनेअंती देशभरातील ओबीसी समाजाचा विश्वासार्ह डेटा उपलब्ध होईल, ज्याचा मोठा फायदा ओबीसींच्या आरक्षणाच्या लाभांवर आणि भविष्यात लोककल्याणकारी धोरणे आखण्यास होणार आहे.

**– छगन भुजबळ, अन्न व नागरी पुरवठा मंत्री**



## SC विद्यार्थ्यांसाठी मोठी खुशखबर!
### सरकार देत आहे थेट १ लाखांचं बक्षीस



**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१७, मुंबई :** राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक आणि प्रोत्साहनपर बातमी आहे. दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना आता राज्य सरकारकडून थेट एक लाख रुपयांपर्यंतचे पारितोषिक दिले जाते आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या ' राजर्षि छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार ' योजनेअंतर्गत हा लाभ दिला जात असून, गुणवंत विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाला यामुळे मोठा आधार मिळतो आहे.

**योजनेबद्दल माहिती**

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली होती. ११ जून २००३ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला होता. २००३ पासून राज्यभरात ही योजना राबवली जाते. ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी ही योजना मोठी मदत ठरत असल्याचे सांगितले जाते.

**लाभाचे स्वरुप काय?**

या योजनेअंतर्गत विविध स्तरांवर गुणवत्तासिद्ध करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक दिले जाते. प्रत्येक बोर्डातून प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्याला एक लाख रुपयांचे बक्षीस दिले जाते. विभागीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना ५० हजार रुपये दिले जातात. जिल्ह्यात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला २५ हजार रुपये, तालुक्यात प्रथम येणाऱ्याला १० हजार रुपये, तर शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला ५ हजार रुपयांचे पारितोषिक दिले जाते. याशिवाय विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्रही प्रदान केले जाते.

**योजनेमागचा उद्देश काय?**

दहावी आणि बारावीच्या परीक्षेत चमकदार कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ मिळावे, हा या योजनेमागचा मुख्य उद्देश आहे. अनेक विद्यार्थ्यांना या योजनेमुळे पुढील शिक्षणासाठी प्रेरणा मिळत असल्याचे चित्र आहे.

**अर्जप्रक्रिया कशी करावी?**

दरम्यान, या योजनेसाठी अर्ज संबंधित जिल्ह्याच्या सहाय्यक आयुक्त कार्यालयात उपलब्ध करून दिले जातात. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी किंवा पालकांनी जिल्हा सामाजिक न्याय कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## विश्वातील पहिले छत्रपती संभाजी महाराजांचे पूर्णाकृती कांस्य शिल्प पुणे येथे

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१७, पुणे :** पुणे महानगरपालिकेच्या वतीने संभाजी महाराज उद्यान येथे उभारण्यात आलेल्या बुधभूषण ग्रंथ रचनाकार छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती शिल्पाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, आमदार डॉ.नीलम गोऱ्हे सिद्धार्थ शिरोळे, हेमंत रासने, महापौर मंजुषा नागपुरे, उप महापौर परशुराम वाडेकर, सभागृह नेता गणेश बिडकर, स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले, महानगर पालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, नगरसेवक, नगरसेविका यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.




**बुधभूषण ग्रंथ रचनाकार छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती शिल्पाविषयी...**

➤ छत्रपती संभाजी महाराज यांचे 'बुधभूषण' ग्रंथ रचतानाचे विश्वातील पहिले १० फुट उंचीचे पूर्णाकृती कांस्य शिल्प महाराष्ट्रात प्रथमच पुणे महानगरपालिकेच्यावतीने शिवाजीनगर येथील छत्रपती संभाजी महाराज उद्यान येथे उभारण्यात आले आहे. या प्रकल्पास एकूण ५ कोटी इतका खर्च झालेला आहे.

➤ छत्रपती संभाजी महाराज यांचे बुधभूषण ग्रंथातील श्लोक निवडण्याकरिता इतिहास तज्ञ, संस्कृत मराठी भाषा तज्ञ, अभ्यासक यांची इतिहास तज्ञ समिती गठीत करण्यात आलेली होती. या समितीमार्फत छत्रपती संभाजी महाराज यांनी लिहिलेल्या संस्कृत 'बुधभूषण' ग्रंथामधून आवश्यक श्लोक निवडण्यात आलेले आहेत.

➤ 'बुधभूषण' संस्कृत ग्रंथ रचनाकार छत्रपती संभाजी महाराज पूर्णाकृती पुतळा व महाराजांनी रचलेल्या ९ निवडक श्लोक मराठी व इंग्रजी अर्थासह तसेच बुधभूषण ग्रंथाची संक्षिप्त माहिती देणाऱ्या प्रस्तावनेसह कोरण्यात आलेले आहेत. याकरिता भव्य १० दगडी भिंती उभारण्यात आलेल्या आहेत. शिल्पाच्या भोवती रंगीत कारंजे, तसेच संपूर्ण परिसरात विविध शोभीवंत फुलझाडे लावण्यासह विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे.

➤ अतिशय कठीण कालखंडामध्ये हिंदवी स्वराज्याची धुरा यशस्वीपणे सांभाळणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व जगासमोर आणण्यासाठी महानगर पालिकेच्यावतीने देदीप्यमान शिल्प उभारण्यात आले आहे. यामुळे पुण्याच्या सांस्कृतिक वैभवात भर पडणार असून या ठिकाणी भेट देणाऱ्या प्रत्येक नागरिकाला महाराजांच्या गौरवशाली इतिहासापासूनची प्रेरणा मिळणार आहे.

अक्षराज






## म्हाडा कोणाच्या पापांचा, कोणाला धडा !

भोंदू अशोक खरात, रवींद्र एरंडे फाइल्स आणि टीसीएस कंपनीतील अत्याचार व कथित धर्मांतराच्या प्रकरणाने नाशिकमध्ये महिला सुरक्षित नसल्याचा 'मेसेज' देशभर गेला. प्रसारमाध्यमे आणि जनसामान्यांत आजही ही प्रकरणे 'ट्रेंडिंग' आहेत. 'गॉसिपिंग' हे भारतीय समाजाचे आणि नाशिककरांचेही स्वभाववैशिष्ट्य (खरे तर दुर्गुणच!) असल्याने आणखी काही दिवस ही प्रकरणे लोकांच्या जिभेवरून उतरणार नाहीत. या कडीत दुर्दैवाने म्हाडा भूखंड गैरव्यवहारही जोडला गेला आहे. सुरुवातीला ही केवळ 'म्हाडा'सारख्या शासकीय संस्थेची फसवणूक असल्याचे अनेकांना वाटले होते. मात्र, बांधकाम व्यावसायिकांपाठोपाठ अधिकारी वर्गातील बड्या माशांचे अटकसत्र सुरू झाले. त्यामुळे या गैरव्यवहाराची व्याप्ती शे-दीडशे कोटींपेक्षाही अधिक आहे आणि अल्पदरात घरकुल मिळविण्याचा सामान्यांना कायद्याने दिलेला अधिकार हिरावला गेल्याचे आता स्पष्ट झाले आहे. महत्त्वाचे म्हणजे, सध्या सुरू असलेले चौकशी व अटकसत्राचे प्रत्यक्ष परिणाम दिसू लागले आहेत. संबंधित अधिकारी वर्ग परागंदा झाल्याने भूमी अभिलेख व महापालिका प्रशासनातील निर्णयप्रक्रिया ठप्प झाल्यासदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

सेवा क्षेत्रात देशात आणि राज्यातही अग्रस्थानाचा दावा करणाऱ्या नाशिकमध्ये नागरिकांशी संबंधित या सेवांना करकचून ब्रेक लागला आहे. वर घोटाळ्याच्या नावाने शहराची बदनामी होते आहे ती वेगळीच! जमिनींचे उतारे, नकाशे, ले-आउट मंजुरीसह विविध परवानग्या आणि सामान्यांच्या इतर कामांचा खोळंबाही झाला आहे. आधीच उशीर झालेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याची कामे थांबली आहेत. खोदकाम करून ठेवलेली अनेक कामे केवळ पुढील मंजुरीच्या सोपस्कारांअभावी तशीच पडून आहेत. ठेकेदारांनी खोदकामे करून ठेवली असल्याने जनसामान्यांना तेथेही अपघात, वाहतूक कोंडी, कंबरेची दुखणी आणि वाहनांचे नुकसान आदी दिव्यांना सामोरे जावे लागते आहे. अधिकारी वर्ग लवकरात लवकर खुर्च्यांवर न बसल्यास येणारा पावसाळा नाशिककरांसाठी 'न भूतो' अशा अडचणींचा ठरणार, हे सांगण्यासाठी कोणा तज्ज्ञाची आवश्यकता नाही. शेवटी 'कुंभ हवा; परंतु खोदकामे आवरा' अशा अवस्थेने आधीच घायकुतीला आलेले सर्वसामान्य नागरिकच पुन्हा भरडले जात असल्याने ''म्हाडा'चा एकदाचा काय तो सोक्षमोक्ष लावा, गुन्हेगारांना पकडा आणि इतरांना मोकळे करा', असा सूर उमटू लागला आहे.

वास्तविक, इतर घोटाळ्यांप्रमाणेच बिल्डर, भूमी अभिलेख, नगररचना आणि राजकारणी अशा साऱ्यांच्याच साट्यालोट्यातून 'म्हाडा'चा भूखंड घोटाळा घडला आहे, ज्यात शेवटी कर भरणाऱ्या शहरवासीयांची लूट होऊन त्यांचा हक्क हिरावला गेला. त्यांच्यावर पुन्हा अन्याय झाला आहे आणि आज त्यांना आपल्या कामांसाठी संबंधित विभागांचे उंबरे वारंवार झिजवावे लागत आहेत. हा गैरव्यवहार वा घोटाळा नसल्याचा दावा काही मंडळी करीत असतील तर फसवणुकीचे 'मॉडेल' त्यांनी अंगवळणी पाडून घेतले आहे, एवढाच त्याचा अर्थ. एक एकरपेक्षा अधिक क्षेत्रावरील बांधकाम प्रकल्पात वीस टक्के क्षेत्र 'म्हाडा'मार्फत आर्थिक दुर्बल घटकांना राखीव ठेवण्याच्या नियमाचा येथे भंग करण्यात आला. विशिष्ट लॉबीच्या संगनमतातून सामान्य जनता, म्हाडा आणि शासन या तीन मुख्य घटकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाली आहे. म्हसरूळ, देवळाली, आडगाव, नांदूर, दसक, चेहेडी आदी ठिकाणच्या भूखंडांचे श्रीखंड खाल्ले गेले आहे. पोलिसांनी भूमी अभिलेखचे उपअधीक्षक बिपिन काजळे, महापालिकेच्या नगररचना विभागाचे सहायक संचालक कल्पेश पाटील आणि महसूलचे नायब तहसीलदार नितीन पाटील यांना गजआड केल्याने या तिन्ही विभागांतील अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. काही प्रकरणांत विकसक, बांधकाम व्यावसायिक व लालफितीने केलेल्या या 'झोल'ची कल्पनाच नसल्याने मूळ जमीन मालकांवरही गुन्हे दाखल झाले आहेत. अर्थात, या मंडळींना तूर्तास जामीन मिळाल्याने दिलासा मिळाला असला, तरी चौकशी व पोलिस ठाण्यातील हजेरीचे बालंट मात्र कायम आहे.

'कोणाच्या पापांचा, कोणाला धडा' अशी स्थिती आहे. हे पाप कोणीही केले असले, तरी यापुढे विकासासाठी जागा कोणाकडे सोपविताना अधिक खबरदार राहावे, सर्व कायदेशीर व तांत्रिक बाजू समजावून घेतल्यानंतरच कागदपत्रांवर सह्या कराव्यात, त्यापूर्वी ते कागद जाणकारांना दाखवून घ्यावेत, हा धडा मूळ मालकांना मिळालाच आहे. काही जागांचे आराखडे मंजूर करताना बनावट सही, शिक्के, बोगस नकाशांचा वापर झाल्याचेही 'एसआयटी'ला आढळून आले. मुख्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपानंतर पोलिस आणि नेमलेली विशेष चौकशी समिती (एसआयटी) जोमाने कामाला लागल्याने आणखी काही अधिकाऱ्यांना अटक होण्याची शक्यता आहे. अर्थात, ही कारवाई टाळण्यासाठी नेमक्या काय 'तरतुदी' होतात, यावरच त्यांचे भवितव्य अवलंबून आहे.

**- संपत थेटे**

# पाण्याची बचत : काळाची गरज !




राज्यातील तापमानाचा पारा जसा वाढत चालला आहे तसा राज्यातील पाण्याचा साठाही आटत चालला आहे. गेल्या काही दिवसात राज्यात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात शेतीसाठी तर सोडाच पिण्यासाठीही पाणी मिळणे कठीण झाले आहे. विशेषतः मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळाच्या झळा जास्त जाणवत आहे. मराठवाड्यात अनेक मोठ्या प्रकल्पात पाणी साठा संपत आला आहे. राज्यातील धरण साठ्यातही सरासरी तीस ते चाळीस टक्केच पाणी शिल्लक आहे. फेब्रुवारीमध्ये राज्यातील पाणी साठा ६९ टक्के इतका होता तो आज ३३टक्क्यांवर आला आहे. राज्यभरातील धरणामधला सुमारे ३६ टक्के उपयुक्त साठा कमी झाला आहे त्यामुळे राज्यातील काही शहरांत चार ते पाच दिवसांतून एकदा पाणी सुटत आहे. राज्यातील ४११ गावे आणि ११९४ वाड्या - वस्त्या टँकरवर अवलंबून आहेत. शासनाकडून ४६६ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. विशेषतः विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची परिस्थिती चिंताजनक आहे. अनेक गावांमध्ये विहिरी आणि बोअरवेल आटल्या आहेत त्यामुळे या गावात टँकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे. काही गावात आठ दिवसातून एकदा टँकर येतो तर काही गावात पंधरा दिवसातून एकदा टँकर येतो. पाण्यासाठी दाही दिशा अशी लोकांची अवस्था झाली आहे. पाणी मिळत नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत. राज्यातील अनेक तालुक्यात पाण्याची पातळी खालावली आहे. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. पाण्यासाठी नागरिकांवर दाही दिशा फिरण्याची वेळ आली आहे. मुकी जनावरे आणि पक्षांना देखील पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याने आणि स्कायमेटने वर्तवला असल्याने पाण्याचे मोठे संकट उभे राहू शकते. यावर्षी पावसाचे आगमन वेळेत होईल असाअंदाज वर्तवण्यात आला असला तरी यावर्षी पावसाचे प्रमाण कमी राहील असाही अंदाज वर्तवण्यात आल्याने दुष्काळाचे संकट आणखी गडद होण्याची शक्यता आहे. अर्थात हे संकट केवळ पावसाच्या कमतरतेमुळे निर्माण झाले असे नाही तर ती नियोजनातील त्रुटी, भूजलाचा अनियंत्रित उपसा, जलस्त्रोतांचे असमान वितरण आणि पाण्याचा अव्यवस्थित वापर या कारणामुळे देखील हे संकट ओढावले आहे. हे संकट आणखी गडद होऊ द्यायचे नसेल तर आतापासूनच पाण्याचे योग्य नियोजन करायला हवे. उपलब्ध पाण्याचा अंदाज घेऊन त्याच्या वाटपाचे नियोजन केले पाहिजे. पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरात आजही २४ तास पाणी पुरवठा केला जातो. २४ तास पाण्याची चंगळ असल्याने कदाचित त्यांना पाण्याचे महत्व माहीत नसेल. पुण्या - मुंबई सारख्या शहरातील काही बेजबाबदार घटक पुरेसे पाणी मिळाल्यानंतर पाण्याची नासाडी करताना दिसतात. नळ खुले सोडून पाणी वाया घालवीत असतात. या शहरातील अनेक ठिकाणी पाण्याची नासाडी होताना दिसते. त्यामुळे या भागातही आवश्यक तितकेच पाणी सोडायला हवे. शहरातीलच नव्हे तर राज्यातील सर्वच नागरिकांनी पाणी जपून वापरायला हवे. भविष्यातील पाण्याचे संकट गांभीर्याने घेऊन पाण्याचा अपव्यय टाळला आणि काटकसरीने वापर केला तर ही वेळ निभावून नेता येईल. पाणी हेच जीवन आहे. थेंब न थेंब पाण्याची बचत केली पाहिजे. पाण्याची बचत करूनच आपण पाण्याची निर्मिती करू शकतो. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे ही काळाची गरज आहे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# माफसू संग्रहालय : ज्ञानाला स्पर्श देणारे जिवंत विद्यापीठ

आजच्या डिजिटल युगात माहितीचा अक्षरशः स्फोट झाला आहे. एका स्पर्शात जगभरातील माहिती उपलब्ध होते पण माहिती आणि ज्ञान यांतला मूलभूत फरक अनेकदा दुर्लक्षित राहतो. माहिती वाचता येते, पाठ करता येते पण ज्ञान समजून घ्यावे लागते, अनुभवावे लागते. म्हणूनच पुस्तकातील अक्षरांना प्रत्यक्ष वास्तवाचा स्पर्श देणारी ठिकाणे समाजाच्या बौद्धिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाची ठरतात. अशा ठिकाणांमध्ये नागपूरातील महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू) येथील संग्रहालय विशेष उठून दिसते. संग्रहालय म्हणजे विज्ञानाची तीर्थक्षेत्रे. शेतकरी, पशुपालक, विद्यार्थी आणि सामान्य जनतेच्या हितार्थ माफसूच्या २३ व्या स्थापना दिनाचे औचित्य साधत ३ डिसेंबर २०२३ रोजी सेमीनेरी हिल्स येथील विद्यापीठ ग्रंथालय परिसरात उभारण्यात आलेले विद्यापीठाचे संग्रहालय जनतेसाठी खुले करण्यात आले. हे संग्रहालय केवळ प्रदर्शनाचे दालन नाही तर ते ज्ञान, संशोधन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचे जिवंत केंद्र





आहे. शेतकरी, पशुपालक, संशोधक आणि विद्यार्थ्यांसाठी ते माहितीचे समृद्ध भांडार आहे तर शालेय विद्यार्थ्यांसाठी विज्ञान युगातील आधुनिक तीर्थक्षेत्रच म्हणावे लागेल.

प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान अधिक सखोल होते, कुतूहल जागते आणि वैज्ञानिक दृष्टी विकसित होते या भावनेतून उभारलेले हे संग्रहालय सांघिक प्रयत्न, शैक्षणिक दृष्टी आणि समाजाभिमुख विचार यांचा सुंदर मिलाफ आहे. आपल्या शिक्षणपद्धतीत अजूनही पाठांतराला मोठे स्थान आहे. विद्यार्थी पुस्तकांतून शरीररचना, रोगरचना, मत्स्यप्रजाती आणि पशुपालन तंत्रज्ञान यांविषयी वाचतात; पण तेच ज्ञान प्रत्यक्ष नमुन्यांच्या रूपात समोर आले की अभ्यासाला नवे परिमाण मिळते. वर्गात शिक्षकांनी स्पष्ट केलेली संकल्पना जेव्हा संग्रहालयातील संरक्षित नमुन्यांतून उलगडते, तेव्हा ज्ञान केवळ माहिती राहत नाही तर ते अनुभव बनते. माफसू अंतर्गत पशुवैद्यकीय, दुग्धतंत्रज्ञान आणि मत्स्यविज्ञान या विद्याशाखांमध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. या तिन्ही शाखांची माहिती आकर्षक माहितीफलक, प्रारूप प्रतिकृती, नमुने आणि पुतळ्यांच्या माध्यमातून स्वतंत्र दालनांत प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकातील रेखाचित्रांना प्रत्यक्ष आकार मिळतो आणि अभ्यास अधिक सजीव बनतो.

माफसू संग्रहालयाचे हेच वेगळेपण आहे. येथे पशुवैद्यकशास्त्राशी संबंधित सांगाडे, विविध प्राण्यांच्या शरीररचनेचे नमुने, रोगग्रस्त अवयवांची उदाहरणे, तसेच मत्स्यविज्ञानातील विविध प्रजातींचे जतन केलेले नमुने पाहता येतात. टॅक्सीडर्मी, वन्यजीव संवर्धन आणि प्रेक्षागृह हे विभाग विशेष प्रेक्षणीय आहेत. वन्यजीवांचे जतन केलेले नमुने, जैवविविधतेची माहिती आणि संवर्धनाचा संदेश यामुळे संग्रहालयाची शैक्षणिक व्याप्ती आणखी विस्तारते. विदर्भ आणि मराठवाडा या भागांत शेतीपूरक दुग्धव्यवसायाला चालना देण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. राज्यातील अनेक शेतकऱ्यांच्या आर्थिक समृद्धीचा दुग्धव्यवसाय हा सक्षम पर्याय ठरत आहे. या पार्श्वभूमीवर अधिक दूध देणाऱ्या आणि सुदृढ पशुधनासाठी आवश्यक पूरक तंत्रज्ञान पशुपालकांपर्यंत पोहोचविणे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

माफसूने पोल्ट्री, डेअरी आणि पशुसंवर्धन क्षेत्रातील विविध घटकांसाठी अनेक प्रकारचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. विशेषतः आयव्हीएफ (इन व्हिट्रो फर्टिलायझेशन) तंत्रज्ञान पशुधनाच्या गुणवत्तावाढीसाठी अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानाचा व्यापक प्रसार होणे काळाची गरज आहे. त्यासाठी केवळ विद्यापीठ नव्हे, तर शेतकरी, पशुपालक, संशोधक आणि विस्तार यंत्रणा यांनीही सांघिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. माफसू अंतर्गत कार्यरत असलेली कृषि विज्ञान केंद्रे या कामात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. आयव्हीएफसह इतर विकसित तंत्रज्ञानाचा प्रसार अधिक प्रभावीपणे व्हावा, यासाठी हे संग्रहालय एक सक्षम ज्ञानदालन म्हणून कार्य करू शकते.

आज शिक्षणक्षेत्रात 'अनुभवाधारित शिक्षण' हा शब्द वारंवार उच्चारला जातो. त्याचा खरा अर्थ अशा संग्रहालयांतच उमजतो. एखाद्या प्राण्याच्या हाडांची रचना, अंतर्गत अवयवांची मांडणी किंवा रोगामुळे झालेला बदल प्रत्यक्ष पाहताना विद्यार्थ्यांची निरीक्षणशक्ती विकसित होते. वैज्ञानिक दृष्टिकोन दृढ होतो, प्रश्न पडतात आणि जिथे प्रश्न निर्माण होतात, तिथूनच संशोधनाची सुरुवात होते. मत्स्यविज्ञानाच्या विद्यार्थ्यांसाठीही हे संग्रहालय तितकेच उपयुक्त आहे. विविध मत्स्यांच्या जाती, त्यांची वैशिष्ट्ये, शरीररचना, पर्यावरणातील त्यांची भूमिका आणि आर्थिक उपयोग या गोष्टी प्रत्यक्ष नमुन्यांमुळे अधिक स्पष्ट होतात. केवळ शैक्षणिक अभ्यासापुरतेच नव्हे, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेही या ज्ञानाचे महत्त्व मोठे आहे.

महाराष्ट्र सारख्या कृषिप्रधान राज्यात पशुधन आणि मत्स्यसंपदा ही केवळ उत्पादनाची साधने नाहीत; ती ग्रामीण कुटुंबांच्या उपजीविकेची आधाररचना आहेत. अशावेळी या क्षेत्रांशी संबंधित ज्ञान लोकाभिमुख करणे ही काळाची गरज आहे. विद्यापीठातील हे संग्रहालय त्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल म्हणावे लागेल. या संग्रहालयाचे महत्त्व केवळ विद्यार्थ्यांपुरते मर्यादित नाही. शेतकरी, पशुपालक, संशोधक, प्रशिक्षणार्थी आणि सामान्य नागरिक यांनाही येथे विज्ञानाशी थेट परिचय होऊ शकतो. पशुरोगांविषयी जागरूकता, जैवविविधतेची ओळख, संवर्धनाचे महत्त्व आणि वैज्ञानिक पद्धतींची आवश्यकता यांची जाणीव अशा ठिकाणी अधिक प्रभावीपणे घडते. दुर्दैवाने, आपल्या समाजात संग्रहालयांकडे अजूनही 'एकदा पाहण्याची जागा' म्हणून पाहिले जाते. शाळा-कॉलेजच्या सहलींच्या कार्यक्रमापुरतेच त्यांचे महत्त्व मर्यादित राहते. ही दृष्टी बदलण्याची गरज आहे. संग्रहालय हे स्थिर प्रदर्शन नसते; ते सतत शिकवणारे, विचार करायला भाग पाडणारे आणि कुतूहल जिवंत ठेवणारे केंद्र असते. नागपूर शहरात आधीच केंद्रीय संग्रहालय, मानववंशशास्त्रीय संग्रहालय, रेल संग्रहालय आणि रमण विज्ञान केंद्र यांसारखी नामांकित संग्रहालये आहेत. त्या परंपरेत माफसूचे हे संग्रहालय निश्चितच नवी भर घालणारे ठरले आहे.

आज जगभरातील नामांकित विद्यापीठे संग्रहालयांचा वापर शिक्षणाच्या केंद्रस्थानी करत आहेत. विद्यार्थ्यांना केवळ माहिती देणे नव्हे, तर त्यांना विचार करायला शिकवणे हा त्यामागील हेतू असतो. भारतातही ही संकल्पना अधिक व्यापक व्हायला हवी. माफसूचे संग्रहालय या दिशेने आशादायी उदाहरण आहे. ज्ञानाचा खरा अर्थ केवळ माहिती मिळवण्यात नसतो तर त्या माहितीमागील वास्तव समजून घेण्यात असतो. संग्रहालय हे त्या वास्तवाशी थेट भेट घडवते. सांगाड्यांमधून उत्क्रांतीची कथा समजते, जतन केलेल्या नमुन्यांतून रोगशास्त्राचे धडे मिळतात, तर मत्स्यनमुने जैवविविधतेचा व्यापक पट उलगडतात. आज विज्ञानाकडे पाहण्याची समाजाची दृष्टी अधिक व्यवहार्य आणि लोकाभिमुख होणे आवश्यक आहे. विज्ञान प्रयोगशाळांपुरते मर्यादित राहिले तर त्याचा सामाजिक उपयोगही मर्यादित राहतो. पण जेव्हा ते संग्रहालयाच्या रूपाने सर्वांसाठी खुले होते, तेव्हा ते समाजाच्या बौद्धिक प्रगतीचे प्रभावी साधन बनते. म्हणूनच माफसूचे हे संग्रहालय केवळ विद्यापीठाची सुविधा नाही तर ती ज्ञानाच्या सार्वजनिक संस्कृतीची पायाभरणी आहे.

विद्यार्थ्यांच्या अभ्यासाला दिशा देणारे, संशोधकांच्या कुतूहलाला चालना देणारे आणि समाजाला विज्ञानाशी जोडणारे हे केंद्र अधिक सक्षम, अधिक समृद्ध आणि अधिक लोकाभिमुख व्हायला हवे. कारण अखेरीस, संग्रहालयात ठेवलेला प्रत्येक नमुना हा फक्त एक वस्तू नसतो तर तो अनुभव असतो, इतिहास असतो, संशोधन असते आणि भविष्यातील ज्ञानाचा पाया असतो. नागपूरच्या शैक्षणिक नकाशावर हे संग्रहालय म्हणूनच विशेष अधोरेखित व्हावे, हीच अपेक्षा. आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनाच्या निमित्ताने ज्ञान, संशोधन आणि संस्कृतीची जपणूक करणाऱ्या सर्व संग्रहालयांना मनःपूर्वक शुभेच्छा. संग्रहालये अशीच विचारांना चालना देत राहोत आणि भावी पिढ्यांना ज्ञानाचा जिवंत वारसा देत राहोत, हीच सदिच्छा.



**- प्रविण बागडे**
**नागपूर**
**मो.९९२३६२०९१९**

## फ्रेंड सर्कल

फेस बुक फ्रेंड सर्कल
टाईमपास काम बेस्ट
ओळख असो नसो रे
पाठव फ्रेंड्सरिक्वेस्ट

मित्रसंचय करा असा
कायम रहायचे अतुष्ट
फ्रेंड रिक्वेस्ट सपाटून
भलेयेवो काही वितुष्ट

प्रतिसाद शून्य भरपूर
असतात काही हर्मुष्ट
सळो पळो करा सदैव
प्रयास करावे परिपुष्ट

फ्रेंड लिस्ट वाढवायचे
काम सोपे हे अक्लिष्ट
एक क्लिक सेंड बटन
उगाचंच चिंता अभिष्ट

वाढदिवसाले शुभेच्छा
मेसेजे कॉपी अन पेस्ट
प्रत्येकासप्रिय अटेंशन
संदेश द्याऑल द बेस्ट

मंत्री संत्री बडे कुणीही
करावे खुशाल धारिष्ट
मित्र बनता का विनंती
येणारं न काही आरिष्ट

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## जनावर तस्करी करणाऱ्या तीन वाहणावर मोठी कार्यवाही

### दहा गोवंशाना जिवदान !



**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.१७, चिमूर :** १६ मे रोजी रात्री १०:३० वाजताचे दरम्याण मुखबिरचे गोपनिय खबरे वरुन पोलीस स्टेशन चिमूर हद्दीत पोलीस स्टॉपचे मदतीने मौजा चिमुर ते वरोरा रोड वरिल आय.टी.आय समोर नाकेबंदी करून आरोनी १) सचिन धनराज वैच्य वय-३३ वर्षे, रा. आकोट ता.पवणी जि.भंडारा यांच्या ताब्यातील महिंद्रा पिकअप वाहन क्र.चक३४ इन ४०६४ मध्ये एकूण ३ जग गौवंशीय जनावरे (बैल) लाखे, पांढरे रंगाचे. २) अमोल तिल्वधर पंचभाई रा.रामपुरी वार्ड पवणी ता.पवणी जि.भंडारा यांचे ताब्यातील महिंद्रा पिकअप वाहन क्र.चक ३६ ऋ २५३४ मध्ये एकूण ४ नग गौवंशीय जनावरे ३) राजेश सोमेश्वर बावनवार. तेव्हा ता.पवणी जि. भंडारा यांचे ताब्यातील महिंद्रा पिकअप वाहन क्र. चक ३६ अअ ००७६ मध्ये एकूण ४ नग गौवंशीय जनावरे असे एकुन १० नग गाँवंशिय जनावरे (बैल. गाय) अवैध्यरीत्या दाटीने गाँहुन निर्दयतेने वाहतुक करीत नेत असता नाकाबंदी करून एकुन २५,००,०००/- लक्ष रु. चा मुद्देमाल ताब्यात घेवुन जप्त करण्यात आला दहा गोवंशाना गौशाळे मध्ये दाखल करुन आरोपी विरुध्द प्राणी संरक्षन अधि. अन्वये कार्यवाही करुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरची कामगीरी मा.पोलीस अधिक्षक चंद्रपुर आयुश नोपानी, मा.अपर पोलीस अधिक्षक इश्वर कातकडे, मा.उप विभागीय पोलीस अधिकारी चिमुर मा.श्री. दिनकर ठोसरे, मा. पोलीस निरीक्षक दिनेश लबडे पोलीस स्टेशन चिमुर यांचे मार्गदर्शनात पो.हवा. पीसे, पो.अं. फाल्गुन परथाके, पी.अं. रोहीत तुमसरे पो.अं. सचिन खामनकर, पो.अं. गणेश वाघ, पो.अं. रुपेश शामकुडे यांनी केली आहे.

## शिक्षक - शिक्षकेत्तर सेनेची ठाणे जिल्हा कार्यकारणी जाहीर



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१७, ठाणे :** शिवसेना पक्षाचे मुख्य नेते महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने महाराष्ट्र राज्य शिक्षक - शिक्षकेत्तर सेनेची ठाणे जिल्हा कार्यकरणीची घोषणा नुकतीच करण्यात आली.

शिक्षक - शिक्षकेत्तर सेनेचे राज्य कार्याध्यक्ष आमदार किशोर दराडे यांच्या हस्ते व राज्य कार्याध्यक्ष दिलीप डुंबरे, राज्य सरचिटणीस शिवाजी शेंडगे यांच्या उपस्थितीत बाळासाहेब भवन, मुंबई येथे या पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

ज्येष्ठ शिवसैनिक व एकनाथ शिंदे यांचे कट्टर समर्थक सुनील फापाळे यांची ठाणे जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. तसेच ऍडव्होकेट अनिकेत फापाळे यांची राज्य कायदेशीर सल्लागार पदी तसेच बाबाची फापाळे यांची ठाणे - पालघर जिल्हा संपर्कप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली. याशिवाय कार्याध्यक्ष जगन्नाथ जाधव, चिटणीस सचिन घोडे, उपाध्यक्ष राजेंद्र निकम व आफाक सलाउद्दीन शेख, कोषाध्यक्ष रवींद्र पाटील व इतर पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या.

यावेळी सुनील फापाळे म्हणाले की, गेली अनेक वर्ष शिक्षकांच्या न्याय हक्क व मागण्यांसाठी लढा देऊन अनेक शिक्षकांचे प्रश्न सोडवले आहेत. यापुढेही एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक - शिक्षकेत्तर सेनेची वाटचाल ही अधिक जोमात आणि जोरात असेल. व यापुढेही सर्व शिक्षक बंधू भगिनींचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू.

## पारनेर तालुक्यातील वन उद्यानाच्या कामावरून मनसे आक्रमक



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१७, सुपा (अहिल्यानगर) :** तालुक्यातील विविध विकासकामांसाठी आणि प्रस्तावित वन उद्यानासाठी निधी मंजूर केल्याबद्दल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने अहमदनगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानण्यात आले आहेत. मात्र, पालकमंत्र्यांच्या चांगल्या हेतूला अधिकारी आणि कंत्राटदारांनी हरताळ फासू नये, असा इशारा मनसे पारनेर तालुक्याच्या वतीने देण्यात आला आहे.

या संदर्भात मनसेचे पारनेर तालुका अध्यक्ष अविनाश मुरलीधर पवार यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. त्यांनी म्हटले आहे की,

पालकमंत्री विखे पाटील साहेब यांनी कामाचा दर्जा उत्तम राखण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. परंतु, अधिकारी आणि कंत्राटदार यांना याचा विसर पडलेला दिसतो. सुपा परिसरात सध्या तीव्र पाणीटंचाई असून नागरिकांना आठ-आठ दिवस पाणी मिळत नाही. अशा परिस्थितीत प्रस्तावित वन उद्यानाच्या ठिकाणी घोटभर पाणीही उपलब्ध नाही. मग या वन उद्यानासाठी पाणी कुठून आणणार? याचे उत्तर संबंधित विभागाने आधी द्यावे.

जुना अनुभव विसरू नका!यापूर्वी नगर-पुणे महामार्गावरील स्ट्रीट लाईट पोलचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करून काही बालिश कंत्राटदारांनी कोट्यवधी रुपयांचा निधी पाण्यात घालवला आहे. केवळ टक्केवारीच्या मोहापोटी भविष्याचा कोणताही विचार न करता ही कामे केली गेली. पालकमंत्र्यांची दिशाभूल करून असे प्रकार पुन्हा खपवून घेतले जाणार नाहीत, असा टोलाही पवार यांनी लगावला.

पाण्याची कोणतीही ठोस व्यवस्था नसताना जर हे काम रेटून नेण्याचा प्रयत्न झाला, तर माळरानावर वन उद्यान फुलण्याऐवजी केवळ बालिश कार्यकर्ते, कंत्राटदार आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांना पोसण्याचे काम होईल, अशी भीती मनसेने व्यक्त केली आहे. जनतेच्या पैशांची अशी उधळपट्टी मनसे सहन करणार नाही.

प्रशासनाने तात्काळ या प्रकल्पाच्या पाण्याच्या स्त्रोताबाबत आणि दर्जाबाबत स्पष्टीकरण द्यावे, अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना आपल्या स्टाईलने तीव्र आंदोलन करेल, असा इशारा मनसे पारनेर तालुका अध्यक्ष अविनाश पवार (८९७५५५९१६७) यांनी दिला आहे.

## बेल्हे जवळ एसटी बस खोल खड्ड्यात कोसळली !

### बसचा चक्काचूर चालकासह एका प्रवाशाचा मृत्यू; २० जण जखमी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, अहिल्यानगर :** कल्याण-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावर रविवारी लालपरी बसचा क्रमांक चक १४इढ४०२३ खोल खड्ड्यात कोसळून अत्यंत भीषण अपघात झाल्याची घटना घडली. बेल्हेजवळील गुंजाळवाडी फाटा परिसरात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने प्रवाशांनी गच्च भरलेली एसटी बस थेट रस्त्याशेजारील खोल खड्ड्यात कोसळली. या दुर्दैवी अपघातात बस चालकासह एका प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला असून, अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. तसेच अपघातातून काही प्रवासी थोडक्यात बचावले.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, सदर बस ही भिवंडी डेपोची होती. सुट्टीचा दिवस असल्याने बसमध्ये प्रवाशांची मोठी गर्दी होती. महामार्गावरून प्रवास करत असताना गुंजाळवाडी फाटा परिसरात अचानक वाहनावरील नियंत्रण सुटले आणि क्षणात बस थेट खोल खड्ड्यात जाऊन कोसळली. अपघात इतका भीषण होता की बसचा दर्शनी भाग पूर्णपणे चक्काचूर झाला. यामध्ये बस चालक एम. वाय सलीम आणि एका प्रवाशाला आपले प्राण गमवावे लागले, तर १५ ते २० प्रवाशांना गंभीर दुखापत झाली.

अपघात होताच परिसरातील स्थानिक ग्रामस्थ, तरुण आणि प्रवाशांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी युद्धपातळीवर म दतकार्य सुरू करून बसच्या खिडक्या आणि दरवाजे तोडून जखमींना बाहेर काढले.

**आळेफाट्यात उपचार सुरू :**



अपघाताची माहिती मिळताच पोलीस प्रशासन आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. अपघातातील सर्व गंभीर जखमींना तातडीने आळेफाटा येथील वेगवेगळ्या खासगी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले असून, तिथे त्यांच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती एसटी महामंडळाचे अधिकारी आरगडे यांनी दिली आहे.

## ठाणे-पालघर TDCC बँकेत मोठा भूकंप : १४ संचालकांना उच्च न्यायालयाचे समन्स

**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.१७, शहापूर (ठाणे) :** ठाणे-पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील कथित गैरव्यवहार, संशयास्पद नोकरभरती आणि आर्थिक अनियमिततेप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेतल्याने सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. सामाजिक कार्यकर्ते तथा याचिकाकर्ते सतीश वाळकू मोहपे यांनी दाखल केलेल्या याचिकेची गंभीर दखल घेत न्यायालयाने बँकेच्या १४ संचालकांना थेट नोटीस बजावत २९ जून २०२६ रोजी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या Writ Petition No. 4013 of 2026 मध्ये ठाणे जिल्हा म ध्यवर्ती सहकारी बँकेतील २०२५-२६ म धील १६५ पदांची नोकरभरती, नियमबाह्य कर्जवाटप, मर्जीतील कर्मचाऱ्यांना अर्थपूर्ण पदोन्नती, तसेच खरेदी व्यवहारांमध्ये कोट्यवधींचे गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

याचिकेनुसार, बँकेच्या अध्यक्षांनी काही संचालकांना हाताशी धरून आणि सहकार विभागातील काही अधिकाऱ्यांच्या सहकार्याने हा कथित गैरकारभार राबविला. अनेक तक्रारी आणि काळ्या यादीत टाकलेल्या कंपनीमार्फत भरती प्रक्रिया राबविल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या सर्व प्रकाराम ुळे गोरगरीब शेतकरी, ठेवीदार आणि ग्राहकांची फसवणूक झाल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला आहे.

**उच्च न्यायालयाची कठोर भूमिका**

२० एप्रिल २०२६ रोजी न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि कमल खाता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. न्यायालयाने आरोप गंभीर मानत संबंधित संचालकांना प्रतिवादी म्हणून समाविष्ट करण्यास परवानगी दिली. तसेच Respondent No. ४ ते २० या संचालकांना नोटीस जारी करण्यात आली.

**न्यायालयाने स्पष्ट केले की,**

संबंधित संचालकांनी २९ जून २०२६ रोजी किंवा त्यानंतर सुनावणीवेळी स्वतः किंवा वकिलामार्फत उपस्थित राहावे.

गैरहजर राहिल्यास न्यायालय याचिकाकर्त्याच्या मागणीनुसार आदेश पारित करू शकते. अंतिम सुनावणीपर्यंत अंतरिम दिलासा लागू राहील.

सूत्रांच्या माहितीनुसार, न्यायालयाने बँकेच्या कारभारात हस्तक्षेप करण्यावरही निर्बंध घातल्याने संचालक मंडळाला मोठा धक्का बसला आहे.



**IBPS आणि WORKWEL कंपनीलाही नोटीस**

या प्रकरणात नोकरभरती प्रक्रिया राबविणाऱ्या WORKWEL कंपनीसह IBPS यांनाही नोटीस देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. भरती प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

**सीबीआय चौकशीची मागणी**

याचिकाकर्ते सतीश मोहपे यांनी २०१७, २०२२ आणि २०२५ मधील सर्व नोकरभरती प्रक्रियेची सीबीआय चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयातही जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सरकारी तपास यंत्रणांनी चौकशी करून माझे आरोप खोटे ठरल्यास भारतीय न्याय संहितेनुसार कोणतीही कारवाई स्वीकारण्यास मी तयार आहे, असे प्रतिज्ञापत्र मुख्यमंत्री आणि मुख्य सचिवांना दिल्याचा दावा त्यांनी केला.

**सहकार विभागावर गंभीर आरोप**

सहकार विभाग जनतेच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करत असून काही अधिकारी बँक व्यवस्थापनाच्या दबावाखाली काम करत असल्याचा आरोपही मोहपे यांनी केला आहे. रिझर्व्ह बँकेने तातडीने प्रशासक नेमून चौकशी सुरू करावी, अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, या प्रकरणामुळे ठाणे-पालघर जिल्ह्यातील शेतकरी, ठेवीदार आणि सहकार क्षेत्रात मोठी चर्चा सुरू झाली असून, बँकेच्या आगामी निवडणुकांवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मतदार यादीतील कथित घोळ आणि चौकशी पूर्ण होईपर्यंत निवडणूक प्रक्रिया किमान सहा महिने पुढे ढकलावी, अशी मागणी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे करण्यात आली आहे.

## मरीआई समाजाच्या शिक्षण, घरकुल, रोजगार व आरोग्य प्रश्नांसाठी झेडपी सिईओंना निवेदन

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१७, सोलापूर :** पिढ्यानपिढ्या उदरनिर्वाहासाठी डोक्यावर मरीआईची मूर्ती, टोपली आणि गळ्यात डमरू घेऊन गावोगावी 'टरबूर टुटबूर' असा आवाज करत भटकंती करणाऱ्या मरीआई समाजाच्या मूलभूत प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कडते यांनी पुढाकार घेतला आहे. मंद्रूप जिल्हा परिषद सदस्या सोनाली कडते आणि प्रशांत कडते यांच्या नेतृत्वाखाली मरीआई समाजाच्या शिष्टमंडळाने सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले.

मंद्रूप येथील इंदिरानगर (मडीवस्ती) आणि संजयनगर परिसरात वास्तव्यास असलेल्या मरीआई समाजाची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. शासनाच्या अनेक योजना उपलब्ध असतानाही हा समाज आजही शिक्षण, रोजगार, घरकुल आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. अनेक वर्षांपासून केवळ मतदानाच्या काळात आश्वासने मिळाली; मात्र प्रत्यक्षात विकासाच्या दृष्टीने कोणतेही ठोस काम झाले



नसल्याची भावना समाजबांधवांनी व्यक्त केली.

यावेळी मरीआई समाजातील महिलांनी डोक्यावर पारंपरिक मरीआईची टोपली आणि गळ्यात डमरू घेऊन जिल्हा परिषद कार्यालयात उपस्थिती लावली. त्यामुळे 'टरबूर टुटबूर' या पारंपरिक आवाजाने प्रथमच जिल्हा परिषदेचा परिसर दुमदुमला. हा समाज कोणत्या परिस्थितीत जीवन जगतो, याची जाणीव अनेक अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष झाली.

शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनात मंद्रूप इंदिरानगर येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात कार्यरत असलेल्या आणि समाजाशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण केलेल्या आरोग्य सेविका वैशाली जगताप यांची बदली रद्द करण्याची मागणी करण्यात आली. त्याचबरोबर मरीआई समाजासाठी विशेष विकास योजना राबवून त्यांना हक्काचे घरकुल उपलब्ध करून देणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी प्रशांत कडते यांनी सांगितले की, आजवर या समाजाचा वापर केवळ व्होट बँक म्हणून झाला. म ात्र आता मरीआई समाजाला उपेक्षेच्या अंधारातून बाहेर काढून विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ठोस प्रयत्न सुरू केले आहेत. समाजातील मुलांच्या हातात देवीची टोपली आणि डमरू नव्हे, तर शिक्षणाची पाटी-पेन्सिल दिसली पाहिजे. मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी मरीआई समाजाच्या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेत शासनाच्या विविध योजना सम ाजापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. यावेळी प्रशांत कडते, सिद्धलिंग म्हेत्रे, किसन मरीआईवाले, संजय मरीआईवाले, आजाराम मरीआईवाले, तायप्पा म रीआईवाले, मशप्पा कोळी यांच्यासह समाजातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते कृषी विद्यापीठाच्या भित्तीपत्रकाचे विमोचन

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१७, राहुरी विद्यापीठ :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या संकल्पनेतून विद्यापीठाने केंद्र शासनाच्या धोरणाला अनुरूप संतुलित खत वापर या विषयावरील भित्तीपत्रक शेतकरी बांधवांसाठी तयार केले आहे. या भितीपत्रकात एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचे महत्त्व, माती परीक्षण, शाश्वत मृद आरोग्यासाठी सेंद्रिय खतांचा वापर, जैविक खतांचा वापर, हिरवळीच्या खतांचे फायदे, रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढवण्यासाठी उपाययोजना, विद्राव्य खतांचा वापर, रासायनिक खत वापरायची पंचसूत्री, सेंद्रिय खतांचा एकात्मिक वापर, आंतरपीक, पीक फेरपालट या महत्त्वाच्या बाबी दिलेल्या आहेत.अहिल्यानगर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित खरीप हंगाम नियोजन व आढावा



बैठकीत या महत्त्वपूर्ण भित्तिपत्रकाचे विमोचन राज्याचे जलसंधारण मंत्री आणि अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी आ. अमोल खताळ, आ विठ्ठल लंघे, आ.विक्रम पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ.गोरक्ष ससाणे, संशोधन संचालक डॉ.प्रशांत बोडके उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे तसेच जिल्ह्यातील विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ.रवी आंधळे, डॉ.पंडित खर्डे, डॉ.संजय तोडमल आणि प्रा.अन्सार आत्तार यांची उपस्थिती होती.

# मुख्यमंत्र्यांच्या भेटीनंतर मनसेची पाटण - मुंबई पदयात्रा स्थगित

## महिन्याच्या मुदतीवर लढा थांबवला, 'मोफत वीज मिळाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही' - गोरख नारकर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१७, पाटण (सातारा) :** पाटण तालुक्याला घरगुती वापरासाठी मोफत वीज मिळावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने नुकतीच पाटण ते मुंबई पायी पदयात्रेला जोरदार सुरुवात करण्यात आली. मात्र, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत एक महिन्याची मुदत दिल्यानंतर नाडे येथील शिवतीर्थावर ही पदयात्रा तात्पुरती स्थगित करण्यात आल्याची घोषणा मनसे तालुकाध्यक्ष गोरख नारकर यांनी केली. सकाळी साडेआठ वाजता पाटण येथील झेंडा चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषात पदयात्रेला प्रारंभ झाला. गोरख नारकर यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या पदयात्रेसाठी यावेळी संपर्क अध्यक्ष गणेश सातपुते, रणजित शिरोळे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाध्यक्ष अँड विकास पवार, तालुका उपाध्यक्ष संजय सत्रे, राहुल संकपाळ, शहराध्यक्ष चंद्रकांत बामणे, मरळी विभाग अध्यक्ष हणमंत पवार, मोरणा विभाग अध्यक्ष रामचंद्र माने, अधिक पवार, कराड तालुकाध्यक्ष सतिश चव्हाण मनसे पदाधिकारी उपस्थित होते.



कोयना धरण, पवनचक्क्या आणि आगामी अदानी प्रकल्पातून मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती होत असताना स्थानिक नागरिकांना त्याचा लाभ मिळत नाही. पाटण तालुक्याने महाराष्ट्राला प्रकाश दिला, पण आमच्याच घरात अंधार आहे. त्यामुळे मोफत वीज आमच्या हक्काची आहे, अशा घोषणा देत जनजागृती करत पदयात्रा पुढे सरकत होती. पदयात्रा म्हावशी गावाजवळ पोहोचली असता भाजपाचे जिल्हा सरचिटणीस याज्ञसेन पाटणकर यांनी पदयात्रेत सहभागी होत आंदोलनाला जाहीर पाठिंबा दर्शविला. त्यामुळे आंदोलनाला सर्वपक्षीय बळ मिळाले. दरम्यान, पोलीस निरीक्षक अविनाश कवठेकर यांनी मध्यस्थी करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सातारा दौऱ्यात आंदोलन प्रतिनिधींची भेट घालून देण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार गोरख नारकर यांच्यासह शिष्टमंडळाने सातारा येथे मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या चर्चेत मोफत वीज व इतर मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा होऊन शासनाने निर्णयासाठी एक महिन्याचा कालावधी दिला आहे. त्यानंतर पदयात्रा नवा रस्ता येथे पोहोचल्यानंतर सर्व आंदोलनकर्त्यांनी एकत्र चर्चा केली. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या मुदतीची वाट पाहण्याचा एकमुखी निर्णय यावेळी घेण्यात आला. निर्णयानंतर नाडे येथील शिवतीर्थावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी मोफत वीज मिळाल्याशिवाय लढा थांबणार नाही, असा निर्धार व्यक्त करत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. शासनाला दिलेल्या मुदतीपर्यंत पदयात्रा तात्पुरती स्थगित करत असल्याची घोषणा गोरख नारकर यांनी केली.

एक महिन्यात निर्णय न झाल्यास पुन्हा मंत्रालयावर धडक देऊ, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. पाटण शहरातून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे राजाभाऊ काळे,शेतकरी संघटनेचे प्रशांत पाटील, दिपकसिंह पाटणकर, संजय इंगवले, शशिकांत देवकांत, विकास हादवे, शुभम उबाळे, रंगराव वाईकर, नितिन पिसाळ, अनिल बोधे, गणेश नायकवडी, गणेश जाधव, रघुनाथ मोळावडे, पांडुरंग पवार, विजयसिंह पाटणकर, सोनू निकम, नवनाथ पवार, अविनाश पवार, किरण हादवे, कोमल डावकरे, सुमन यादव, शोभा काजवे यांच्यासह तालुक्यातील विविध संघटना, पक्षांचे पदाधिकारी, मनसे कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.सह अनेक महिला उपस्थित होत्या. पाटण, म्हावशी, अडूळ, नवारस्ता येथील विविध उद्योजक, मित्र परिवार, हितचिंतक यांनी जागोजागी सत्कार, प्रोत्साहन दिले. तसेच पदयात्रेतील लोकांना सरबत, नाश्ता, लाडू, चिवडा, पोहे, थंड पाणी अशी सोय केली.

# थोडक्यात

## विसापुरातील हत्याकांड प्रकरणात ५ आरोपींना अटक

### ३ महिन्यापूर्वीच्या आपसी वादातून घडले हत्याकांड



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर शहरात ३ महिन्यापूर्वी विसापूर येथे गुंडाच्या टोळीने हत्या केलेल्या विराज राजेश आगदरी व आरोपी मध्ये आपसी वाद झाला होता. या वादाच्या वचप्यातून दिनांक १५ मे २०२६ रोजी संध्याकाळी ६ वाजताच्या सुमारास विसापूर येथे रेल्वे चौका लगत भर रस्त्यावर विराज ची हत्या करण्यात आली. याप्रकरणी बल्लारपूर पोलिसांनी एका विधी संघर्ष बालकासह ५ आरोपींना २४ तासाच्या आत अटक केली. मृतक विराज व त्याचे मारेकरी बल्लारपूर येथील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

बल्लारपूर येथील विराज राजेश आगदरी हा युवक दिनांक १५ मे रोजी संध्याकाळी ५ वाजता दरम्यान विसापूर येथील एका हेअर सलूनमध्ये आला होता. तुकडोजी चौक मध्ये तो आला असता आरोपींनी त्याचेवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र विराज ने तेथून पळ काढला. दुचाकी वाहनाने आलेल्या आरोपींनी त्याचा सिनेस्टाईल पाठलाग केला. त्याचेवर खंजर आणि तलवार शस्त्राने हल्ला केला. हल्ला चुकवत तो रेल्वे चौक ते सुरभी चौक दरम्यान रस्त्याने धावत सुटला. नेमक्या त्याच वेळी अली शेख यांच्या दारासमोर फाटकाजवळ जवळ आरोपींच्या जाळ्यात विराज अटकला. त्याचेवर आरोपींनी एका मोठ्या दगडाने प्रहार करुन ठार केले.

त्याला ठार करून आरोपींनी दुचाकी वाहनाने विसापूर येथून पळ काढला. ते सर्व आरोपी नागपूर येथे पळून गेल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्या माहितीच्या आधारे आरोपी मोनू ऊर्फ रौनक सुखपाल निषाद (१९), आकाश रामकरण निषाद (२१), जिशान शरीफ सिद्दीकी (१९), समीर कलीम खान (२१) व एक विधिसंघर्ष मुलगा असे एकूण ५ आरोपींना बल्लारपूर पोलिसांनी अटक केली आहे. विशेष म्हणजे (दि.१५) रोजी रात्री ९.४५ वाजता चंद्रपूर चे पोलीस अधीक्षक आयुष नोपानी व अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांनी घटनास्थळी भेट दिली होती. या प्रकरणात आरोपींना जेरबंद करण्यासाठी बल्लारपूर चे पोलीस निरीक्षक विपीन इंगळे यांनी तातडीने तीन पथके गठीत केले होते. पोलिसांनी तातडीने आरोपींना पकडण्यासाठी उपाययोजना केल्याने विसापूर येथील हत्याकांडातील आरोपींना जेरबंद करण्यात यश आले आहे.

# हिमोफिलिया रुग्णांसाठी उपचाराबरोबर व्यायाममहत्व - डॉ.गोपाळ बहुरूपी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, अहिल्यानगर :** हिमोफिलिया हा ७० टक्के अनुवांशिक व ३० टक्के बदलते जनरेशनमुळे होत असल्याने जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञान विकसीत झाले असून उपचारा बरोबर व्यायामालाही तितकेच महत्व असल्याचे प्रतिपादन अहिल्यानगरचे प्रसिद्ध रक्त विकार तज्ञ डॉ.गोपाळ बहुरूपी यांनी केले. अहिल्यानगर येथे नुकतेच आयोजित जागतिक हिमोफिलिया दिनानिमित्त ते बोलत होते. याप्रसंगी बालरोग तज्ञ डॉ. चेतना बहुरूपी,हिमोफिलिया फेडरेशन ऑंफ इंडिया नवी दिल्ली चे युथ चेअरमन सौरभ नलमवार, हिमोफिलिया फेडरेशनचे माजी उपाध्यक्ष रामू गडकर, डॉ.अशोक ठाकरे,डॉ.रूपाली कुलकर्णी, डॉ.अमृता गवळी, डॉ.भाऊसाहेब खिलारी, हिमोफिलिया सोसायटी अहिल्यानगर चँप्टरचे अध्यक्ष दादा भालेकर, आसाराम तळेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी डॉ.बहुरूपी बोलताना म्हणाले की, पूर्वी निदाना अभावी हिमोफिलिया रूग्ण दगावण्याचे प्रमाण फार मोठे होते मात्र जसजसे तंत्रज्ञान वाढत गेले तसे हिमोफिलिया बाबत जागतिक पातळीवर जिन थेरपी,नॉंन फॅंक्टर थेरपी बरोबर नव्याने येत असलेल्या टॅंबलेट व अत्याधुनिक फॅंक्टर ची उपलब्धतेमुळे हिमोफिलिया रुग्णांना जीवन सुखकर झाले आहेत. याप्रसंगी डॉ.चेतना बहुरूपी बोलताना म्हणाले की, मनुष्य शरीराने विकलांग नसून बुद्धीने विकलांग झाला तर काहीही करू शकत नाही याला अपवाद हिमोफिलिया परिवार असून तो बुध्दीने हुशार आहेत.बाल्य अवस्थेत हिमोफिलिया बाबत घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ. अशोक ठाकरे, डॉ.रूपाली कुलकर्णी, डॉ.अमृता गवळी, डॉ.भाऊसाहेब खिलारी, दादा भालेकर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी कार्यक्रमास डॉ.ज्ञानदेव आव्हाड, अरूण पानसंबळ, सचिन देऊळगावकर, शुभम कदम, श्रुती कुकडे, संगिता कदम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रामू गडकर यांनी तर आभार आसाराम तळेकर यांनी मानले.




**◆ हिमोफिलिया रूग्णांसाठी साई सावली मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचा आधार**

गेल्या काही महीण्यांपूर्वी हिमोफिलिया फेडरेशन ऑंफ इंडिया नवी दिल्ली यांच्या माध्यमातून टाकळी ढोकेश्वर येथील साई सावली मल्टीस्पेशालीटी हॉंस्पिटल येथे हिमोफिलिया ट्रिटमेंट सेंटर सुरू केले असून रूग्णांना मोठा आधार मिळाला असल्याचे प्रतिपादन हिमोफिलिया फेडरेशनचे युथ चेअरमन सौरभ नलमवार यांनी केले.

# बाबूपेठ येथे सर्वरोग निदान व उपचार शिबिर संपन्न

## विविध आजारांवर नि:शुल्क उपचार



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** सर्वसामान्यांच्या आरोग्यासाठी मोफत सेवा उपलब्ध करून देणे हीच खरी लोकसेवा असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात. आर्थिक परिस्थितीमुळे कुणीही उपचारांपासून वंचित राहू नये आणि गंभीर आजारांचे वेळेत निदान व्हावे. या उद्देशाने आयोजित भव्य सर्वरोग निदान व उपचार शिबिरात ते बोलत होते. चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे आ. किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून तसेच भारतीय जनता पार्टी चंद्रपूर महानगर, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय सावंगी (मेघे), सामान्य रुग्णालय चंद्रपूर व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज रविवारी बाबूपेठ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर बायपास रोडवरील के.जी.एन. कॉन्व्हेंट येथे भव्य सर्वरोग निदान व उपचार शिबिर आयोजित करण्यात आले होते.

यावेळी आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाचे विभागप्रमुख डॉ. शशांक बोथरकर, भारतीय जनता पार्टीचे माजी महानगराध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, भाजप प्रदेश युवा मोर्चा उपाध्यक्ष रघुवीर अहिर, महामंत्री श्याम कनकम, सविता दंढारे, विधानसभा अध्यक्ष दशरथसिंह ठाकूर, वंदना हातगावकर, तुषार सोम, मंडळ अध्यक्ष प्रदीप किरमे, सायली तोंडरे, गणेश गेडाम, दिवाकर पुडट्टवार, निलिमा वनकर, के. जी.एन. कॉन्व्हेंटचे संस्थापक महेमुद शेख, विमल कातकर आदींची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ.जोरगेवार म्हणाले की, आज आयोजित करण्यात आलेले हे भव्य सर्वरोग निदान व उपचार शिबिर हे केवळ एक आरोग्य शिबिर नसून सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. समाजातील प्रत्येक नागरिकाला चांगल्या आरोग्य सेवा मिळाल्या पाहिजेत. आर्थिक परिस्थितीमुळे कुणीही उपचारांपासून वंचित राहू नये, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आज सर्वसामान्य कुटुंबांना मोठमोठ्या आजारांच्या उपचारासाठी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अनेक वेळा तपासण्या, औषधोपचार आणि शस्त्रक्रिया यांचा खर्च परवडत नसल्यामुळे रुग्ण उपचार घेण्यास उशीर करतात. यामुळे आजार अधिक गंभीर होतात. हीच बाब लक्षात घेऊन विविध तज्ज्ञ डॉक्टरांना एकत्र आणत हे मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये मेडिसिन, नेत्ररोग, स्त्रीरोग, बालरोग, त्वचारोग, अस्थिरोग, कान-नाक-घसा तसेच शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉक्टर नागरिकांची तपासणी करणार आहेत. रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, मोतीबिंदू, हर्निया, महिलांचे आजार, सांधेदुखी, त्वचारोग यांसारख्या अनेक आजारांवर मोफत तपासणी व उपचार उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे गरज असलेल्या रुग्णांवर मोफत शस्त्रक्रियादेखील करण्यात येणार आहेत. गरीब व गरजू नागरिकांना मोठा आर्थिक दिलासा मिळावा, हा यामागचा मुख्य हेतू आहे. एक्स-रे, रक्त तपासणी, लघवी चाचणी, सोनोग्राफी तसेच आवश्यकतेनुसार सीटी स्कॅन व एमआरआय तपासण्यादेखील मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ही सेवा सामान्य नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे ते म्हणाले.यावेळी हजारो नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला.

# आम्ही टाकळीकर व नाम फाऊंडेशनच्या जलसंधारण कामाचा शुभारंभ

## पाणलोट क्षेत्रात वाढ होणे गरजेचे - मंत्री राधाकृष्ण विखे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१७, पारनेर (अहिल्यानगर) :** वाढत्या तापमानामुळे पाण्याची स्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. त्यामुळे जलसंवर्धन चळवळ राबवून पाणलोट क्षेत्रात वाढ होणे गरजेचे आहे. त्यासाठी आम्ही टाकळीकर व नाम फाऊंडेशनने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.



आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठान व नाम फाऊंडेशन यांच्या वतीने टाकळी ढोकेश्वर येथे राबविण्यात येणाऱ्या जलसंधारण कामाच्या दुसऱ्या टप्प्याचा शुभारंभ मंत्री विखे यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी आमदार काशिनाथ दाते होते. स्वागत सरपंच तथा प्रशासक अरुणाताई खिलारी यांनी केले. आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे संस्थापक चाँद शेख यांनी प्रतिष्ठानने १२ वर्षात राबविलेल्या विविध प्रकल्पांची माहिती दिली. या जलसंधारण कामात आम्ही टाकळीकर व नाम फाऊंडेशन सोबत सकाळ रिलीफ फंड, टाटा मोटर्स, पारनेर तालुका पत्रकार संघ, ग्रामपंचायत, सेवा सहकारी सोसायटी, ढोकेश्वर सैनिक फाऊंडेशन, सावली प्रतिष्ठान यासह विविध संस्था व ग्रामस्थ सहभागी होणार आहेत.

मंत्री विखे म्हणाले, पाण्याचा संघर्ष दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे कायम स्वरूपी पाण्याची व्यवस्था होणे गरजेचे आहे. नजीकच्या राळेगण सिद्धी व हिवरे बाजार गावात अण्णा हजारे व पोपटराव पवार यांनी लोकसहभागातून जलक्रांती घडवून आणली. असे काम प्रत्येक गावात होणे गरजेचे आहे. दुष्काळमुक्त करण्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझ्यावर सोपवली आहे. त्यामुळे पाणी प्रश्न सोडविण्यासाठी माझा नेहमी प्रयत्न राहील. दुष्काळ कायमचा संपायला हवा यासाठी जलशिवार अभियान प्रभावीपणे राबविले जाईल.

आमदार दाते यांनी तालुक्यात जलसंधारण कामे मोठ्या प्रमाणात सुरू असून त्यांना शासन सर्व सहकार्य करेल अशी भूमिका यावेळी मांडली. यावेळी आम्ही टाकळीकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब बांडे, नाम फाऊंडेशनचे विशाल नगरे, टाटा मोटर्सचे प्रसाद जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य विश्वनाथ कोरडे, वसंत चेडे, राहुल शिंदे, विनायक देशमुख, जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेचे माजी अध्यक्ष रावसाहेब रोहोकले, सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.भाऊसाहेब खिलारी, बाजार समितीचे माजी सभापती प्रशांत गायकवाड, माजी उपसभापती विलास झावरे, संचालक अशोकशेठ कटारिया, सेवा सोसायटीचे चेअरमन नारायण झावरे, व्हा. चेअरमन मोहन रांधवण, माजी सरपंच शिवाजी खिलारी, संजय उदावंत, लताताई आल्हाट, ढोकेश्वर सैनिक फाऊंडेशनचे अध्यक्ष दिगंबर शेळके, खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन बाबासाहेब खिलारी, पत्रकार शरद झावरे, सनी सोनवळे, आम्ही टाकळीकर प्रतिष्ठानचे विश्वस्त संदीप कोरडे, स्थानिक समन्वयक संतोष सोनावळे, प्रताप खिलारी , संदीप खिलारी , आदिनाथ पायमोडे, शुभम गोरडे, अक्षय गोरडे, बाळशिराम पायमोडे, दादाभाऊ नवले, मंगेश खिलारी , संजय झावरे, गणेश चव्हाण, धनंजय आल्हाट, गणेश गायकवाड आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नावडे उपविभागात अतिक्रमण विरोधी कारवाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१७, पनवेल :** प्रभाग समिती 'अ' अंतर्गत नावडे उपविभागात आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशान्वये सेक्टर ३४ व सेक्टर ३५ परिसरातील मार्जिनल स्पेसच्या बाहेर ठेवण्यात आलेल्या वस्तू हटविण्याची कारवाई १६ मे पासून सुरू करण्यात आलेली आहे.

तसेच फुटपाथवर हातगाडीच्या माध्यमातून अनधिकृतपणे उद्योग व व्यवसाय करणाऱ्यांवर अतिक्रमण कारवाई देखील करण्यात येत आहे.

पनवेल महापालिकेच्या चारही प्रभागांमध्ये अतिक्रमण विरोधात कठोर कारवाई करण्याच्या सूचना अतिरीक्त आयुक्त महेश कुमार मेघमाळे व उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी दिल्या असून त्यानुसार अतिक्रमण विरोधात मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू आहे.सहायक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी सुबोध ठाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नावडे उपविभागात मार्जिनल स्पेसच्या बाहेर ठेवण्यात आलेल्या वस्तू हटविण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे.

या कारवाई अंतर्गत अतिक्रमण विरोधी पथकाने सेक्टर ३४ व सेक्टर ३५ परिसरातील दुकानाबाहेरील मार्जिनल स्पेसच्या बाहेर ठेवण्यात आलेल्या वस्तू जप्त केल्या. तसेच फुटपाथवर हातगाडीच्या माध्यमातून अनधिकृतपणे उद्योग व व्यवसाय करणाऱ्यांवर देखील अतिक्रमण विभागाच्या कर्मचाऱ्यांनी कारवाई करून सामान जप्त केले.